मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी चिंचवड व नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील दस्त नोंदणीच्या मुद्रांक शुल्कामध्ये दि. ०१.०४.२०२० पासून पुढील २ वर्षाच्या कालावधीकरीता १ टक्के सवलत देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**चौथा मजला (मुख्य इमारत), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**आदेश क्र. एमआरडी-३३२०/प्र.क्र. २४/नवि-७**
**दिनांक :- २८ मार्च, २०२०**

**संदर्भ:-** १. महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसूचना असाधारण क्र. ५६ दि. २१.०८.२०१५
२. महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसूचना असाधारण क्र. ११९ दि. १७.१२.२०१८
३. महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसूचना असाधारण क्र. १६ दि. ०८.०२.२०१९
४. महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसूचना असाधारण क्र. १७ दि. ०८.०२.२०१९

**प्रस्तावना:-**

संदर्भिय अधिसूचनांन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-१९४९ व मुंबई महानगरपालिका अधिनियम-१९८८ मधील तरतुदींमध्ये सुधारणा करुन अनुक्रमे कलम १४९ (अ) व कलम १४४ (ई) नव्याने समाविष्ट करण्यात आले आहे. सदर सुधारीत तरतूदींनुसार महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प राबविण्यात येत असलेल्या महानगरपालिका क्षेत्रात स्थावर मालमत्तेची अनुक्रमे विक्री, दान व फलोपभोग गहाण या संबंधीच्या संलेखांवर मुद्रांक शुल्क अधिनियमान्वये आकारावयाच्या मुद्रांक शुल्कात एक टक्का दराने अधिभार आकारुन वाढ करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतुदीनुसार अतिरिक्त मुद्रांक शुल्क ज्या दिनांकापासून वा नंतर आकारले जाईल त्यासाठी दिनांक ८ फेब्रुवारी, २०१९ हा दिनांक विनिर्दिष्ट करण्यात आला आहे. प्रस्तुत तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात येत असून त्यानुसार पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

-: आदेश :-

अ) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी चिंचवड व नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील दस्त नोंदणीच्या वेळी भराव्या लागणाऱ्या एकंदरीत मुद्रांक शुल्क आणि इतर निगडीत भारामध्ये दिनांक ०१ एप्रिल, २०२० पासून पुढील २ वर्षाच्या कालावधीकरीता १ टक्के सवलत देण्यात येत आहे.

ब) सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक ०१ एप्रिल, २०२० पासून करण्यात यावी.

क) याबाबतची अधिसूचना स्वतंत्ररीत्या निर्गमित करण्यात येईल.

(विजय चौधरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत:-**

मा. राज्यपाल महोदयांचे सचिव
मा. मुख्य सचिव, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई.